खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

ता. खेड, जि. पुणे. ४१० ५०५

## प्रथम वर्ष कला

## द्वितीय सत्र

## भूगोल ( जी– १ )

**विषय -Gg 110 (A) भूगोल (मानवी भूगोल)**

## प्रा. दिलीप ज्ञानेश्वर मुळूक

भूगोल विभाग

शैक्षणिक वर्ष २०१९ – २०२०पासून

# प्रकरण तिसरे - वसाहती

# अभ्यास घटक - महाराष्ट्रातील नागरीकरण

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरूनगर, ता. खेड, जि. पुणे ४१०५०५

नवीन अभ्यासक्रम सेमीस्टर पॅटर्न २०१९

## द्वितीय सत्र अभ्यासक्रम

वर्ग - प्रथम वर्ष कला (FYBA)

विषय - Gg 110 (B) भूगोल (मानवी भूगोल)

| अ. नं. | घटक | उपघटक | तासिका | एकूण श्रेयांक |
|---|---|---|---|---|
| 1. | मानवी भूगोलाचा परिचय | 1. मानवी भूगोल – व्याख्या आणि अर्थ<br>2. मानवी भूगोलाचे स्वरूप आणि व्याप्ती<br>3. मानवी भूगोलाच्या शाखा आणि महत्त्व | 12 | 03 |
| 2. | लोकसंख्या | 1. लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे घटक<br>2. लोकसंख्या संक्रमण सिंध्दात<br>3. भारतीय लोकसंख्येची संरचना (लिंगरचना आणि साक्षरता) | 12 | |
| 3. | वसाहती | 1. ग्रामीण वस्त्यांचे प्रकार आणि प्रारूप (आकृतीबंध)<br>2. भारतातील नागरीकरण<br>3. महाराष्ट्रातील नागरीकरण | 12 | |
| 4 | कृषी / शेती | 1. शेतीचे प्रकार<br>2. शेतीवर परिणाम करणारे घटक<br>3. भारतीय शेतीसमोरील समस्या | 12 | |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रथम वर्ष द्वितीय सत्रासाठी कला भूगोल विषयाच्या पाठ्यक्रमाचा अनुवाद

# प्रकरण तिसरे

# वसाहती (Settelment)

# अभ्यास घटक क्रमांक ३

# महाराष्ट्रातील नागरीकरण

महाराष्ट्रातील नागरीकरण

महाराष्ट्रातील नागरीकरणाचा कल १९०१ ते २०११

महाराष्ट्रातील नागरीकरणाचे जिल्हानिहाय वितरण

महाराष्ट्रातील दशलक्षी शहरे

महाराष्ट्रातील महानगरपालिका क्षेत्रे

महाराष्ट्रातील नागरीकरणाची वैशिष्टये

## महाराष्ट्रातील नागरीकरण

भारतातील राज्यांमध्ये शहरी लोकसंख्येची टक्केवारी वाढत आहे. प्रादेशिक विकासाच्या विश्लेषण आम मध्ये एखाद्या राज्यातील शहरी लोकसंख्या मध्ये झालेली वाढ ही सर्वात महत्त्वाची सूचक आहे. सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या विश्लेषणामध्ये शहरी लोकसंख्येत झालेली वाढ महत्त्वाची भूमिका बजावते. २०११ मध्ये महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११,२३,७२,९७२ (९.२९ टक्के) इतकी असून, उत्तरप्रदेशाच्या लोकसंख्येनंतर महाराष्ट्राचा लोकसंख्येच्या संदर्भात दुसरा क्रमांक लागतो. मागील दशकांमध्ये महाराष्ट्राच्या लोकसंख्येमध्ये १७.८ दशलक्ष लोकसंख्येचे भर पडली आहे. १९९१ ते २०११ या कालावधीत महाराष्ट्राची नागरी लोकसंख्या ३०.५४ दशलक्षाहून ५०.८३ दशलक्ष पर्यंत पोहोचले आहे. संपूर्ण देशाच्या तसेच महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून शहरी भागाकडे झालेल्या स्थलांतरामुळे महाराष्ट्राच्या नागरी लोकसंख्येमध्ये कमालीची वाढ झालेली आहे. महाराष्ट्राच्या नागरीकरणाच्या संदर्भात झालेली वाढ ही अतिशय विषम स्वरूपाची आहे महाराष्ट्राच्या पूर्व भागाच्या तुलनेत पश्चिम भागामध्ये नागरी लोकसंख्येचे प्रमाण अधिक वाढल्याचे दिसते. महाराष्ट्रातील मराठवाडा आणि विदर्भामध्ये नागरीकरणाची पातळी सर्वात कमी आहे. याउलट औद्योगीकरण माहिती तंत्रज्ञान आणि शैक्षणिक प्रगतीमुळे मुंबई, पुणे, आणि नागपूर या जिल्ह्यांमधील शहरीकरणाच्या पातळीमध्ये झपाट्याने बदल झालेला दिसतो. महाराष्ट्रातील मुंबई आणि मुंबईच्या उपनगरांमध्ये १०० टक्के शहरीकरण झाल्याचे दिसते. याउलट सिंधुदुर्ग, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये नागरीकरणाची पातळी सर्वात कमी आहे. ( १५ टक्क्याहून कमी). मुंबई आणि उपनगरांत मिळून १.८४ कोटीहून अधिक लोकसंख्या आहे. महाराष्ट्रामध्ये एकूण सहा नागरीकरण झालेले विभाग आहे त्यामध्ये मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, वसई विरार, आणि औरंगाबाद या सर्व विभागांची लोकसंख्या दहा लक्षा हून अधिक आहे. महाराष्ट्रातील शहरांमध्ये लोकसंख्या वाढीचे प्रमुख कारण म्हणजे रोजगाराची हमी, शिक्षण आणि उच्च दर्जाचे राहणीमान या घटकांमुळे देशाच्या विविध भागातून आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लोक शहरांकडे आकर्षिले जातात. नागरीकरणाच्या बाबत शेकडेवारीत महाराष्ट्राचा भारतात पाचवा क्रमांक लागतो. परंतू एकूण लोकसंख्येची तुलना केली असतात महाराष्ट्रामध्ये असणारील ५०.८३ दशलक्ष लोकसंख्या ही भारतातील कोणत्याही राज्यातील नागरी लोकसंख्येच्या तुलनेत सर्वाधिक आहे. त्यामुळे एकूण लोकसंख्येच्या प्रमाणाचा विचार केला असतात भारतात महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आहे. भारतातील एकूण शहरी लोकसंख्येपैकी १३.५ टक्के लोकसंख्या महाराष्ट्रात

राहते. महाराष्ट्राखालोखाल उत्तरप्रदेशात ११.८ टक्के नागरी लोकसंख्या आहे. उर्वरित कोणत्याही राज्यामध्ये हे प्रमाण १० टक्क्याहून अधिक नाही.

## महाराष्ट्रातील नागरीकरणाचा कल १९०१ ते २०११


वरील आलेखाचे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, महाराष्ट्रातील शहरी लोकसंख्येमध्ये १९०१ पासून दोन अपवाद वगळता सातत्याने वाढ होत गेली आहे. १९०१ सालामध्ये नागरी लोकसंख्येचे शेकडा प्रमाण १६.५९ टक्के होते. त्यामध्ये १९११ मध्ये झालेल्या जनगणनेमध्ये किंचित घट झाली व हे प्रमाण १५.१३ टक्के इतके झाले. त्यानंतर १९२१ पासून नागरी लोकसंख्येच्या शेकडा प्रमाणामध्ये सातत्याने चढ–उतार होत गेल्याचे दिसते. १९४७ शाली भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर १९५१ मध्ये झालेल्या जनगणना अहवालानुसार महाराष्ट्राच्या नागरी लोकसंख्येमध्ये दशवार्षिक ७.६४ टक्के इतकी सर्वात जास्त शेकडा वाढ होऊन नागरी लोकसंख्येचे शेकडा प्रमाण २८.७५ एवढे झाले. त्यानंतर १९६१ साली झालेल्या जनगणनेमध्ये शेकडा प्रमाणामध्ये –०.५३ टक्के अशी किंचित घट झाली. त्यानंतर मात्र नागरी लोकसंख्या वाढीचा आलेख सतत चढता राहिल्याचे दिसून येते. २०११ सालामध्ये महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्येचे शेकडा प्रमाण ४५.२२ इतके होते. हे प्रमाण भारताच्या नागरी लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा अधिक असल्याचे दिसते.

**तक्ता – महाराष्ट्रातील ग्रामीण आणि शहरी लोकसंख्येचे शेकडा प्रमाण १९०१ ते २०११**

| जनगणना वर्ष | नागरी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण | ग्रामीण लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| 1901 | 16.59 | 83.41 |
| 1911 | 15.13 | 84.87 |
| 1921 | 18.5 | 81.5 |
| 1931 | 18.6 | 81.4 |
| 1941 | 21.11 | 78.89 |
| 1951 | 28.75 | 71.25 |
| 1961 | 28.22 | 71.78 |
| 1971 | 31.17 | 68.83 |
| 1981 | 34.99 | 65.01 |
| 1991 | 38.73 | 61.31 |
| 2001 | 42.43 | 57.57 |
| 2011 | 45.22 | 54.77 |

**स्त्रोत – जनगणना अहवाल १९०१ ते २०११**

**आलेख – महाराष्ट्रातील ग्रामीण आणि शहरी लोकसंख्येचे शेकडा प्रमाण १९०१ ते २०११**




## महाराष्ट्रातील नागरीकरणाचे जिल्हानिहाय वितरण

२०११च्या जनगणना अहवालानुसार महाराष्ट्रामध्ये जिल्हानिहाय नागरीकरणाचा कल पाहिला असता असे दिसून येते की, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, नागपूर, मुंबई, नाशिक या जिल्ह्यांची नागरी लोकसंख्या पंचवीस लाखाहून अधिक आहे. त्याखालोखाल औरंगाबाद, सोलापूर, जळगाव, कोल्हापूर आणि अमरावती या जिल्ह्यांमधील नागरी लोकसंख्या दहा लाखांहून अधिक आहे. बृहन्मुंबई आणि मुंबई हे दोन जिल्हे १०० टक्के नागरीकरण झालेले आहेत. मुंबई आणि मुंबई उपनगर या जिल्ह्यांचा खालोखाल २०११ च्या जनगणना अहवालानुसार ठाणे (८५,०३,०९४) जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त नागरी लोकसंख्या असल्याचे आढळून येते. त्यानंतर पुणे जिल्ह्यामध्ये पुणे आणि पिंपरी चिंचवड या शहरांची तसेच जिल्ह्यातील इतर नागरी भागांची लोकसंख्या (५७,९३,७१६) इतकी आहे. महाराष्ट्रामध्ये सर्वात कमी नागरी लोकसंख्येचे प्रमाण सिंधुदुर्ग (१०६९९८) जिल्ह्यामध्ये आहे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नागरी लोकसंख्येचे शेकडा प्रमाण फक्त १२.६० टक्के इतके आहे. व सर्वात कमी शेकडा प्रमाण गडचिरोली जिल्ह्यामध्ये ११ टक्के इतके आहे. त्यानंतर हिंगोली जिल्ह्यांमध्ये १५.१७ टक्के, वाशिम १७.

६९ टक्के, आणि गोंदिया १७.०७ टक्के. एवढे नागरी लोकसंख्येचे प्रमाण आहे. पूर्व महाराष्ट्रातील जिल्हयामध्ये नागरी लोकसंख्येत झालेली शेकडा वाढ जरी अधिक असली तरी एकंदरीत लोकसंख्येचे प्रमाण कमी आहे.

**१) सर्वाधिक नगारीकरण (७५ ते १०० टक्के)**

महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक नागरीकरण मुंबई मेट्रो पोलिटीयन शहराच्या आसपासच्या प्रदेशात झाल्याचे दिसते. क्क्यांहून अधिक जास्त नागरीकरण झालेल्या जिल्ह्यांमध्ये मुंबई, मुंबई उपनगर आणि ठाणे या जिल्ह्यांचा समावेश होतो. यापैकी मुंबई आणि मुंबई उपनगर या जिल्ह्यांमध्ये १०० टक्के नागरीकरण झालेले आहे. तर मुंबईजवळील ठाणे जिल्ह्यामध्ये ७६.९२ टक्के नागरीकरण झालेले आहे. २०११च्या जनगणना अहवालानुसार मुंबई आणि परिसरामध्ये नागरीकरणाची पातळी सर्वोच्च आहे. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे हे सर्व परिसर एकमेकांच्या जवळ आहेत. या भागांमध्ये महाराष्ट्रातील एकूण २७ महानगरपालिकांपैकी आठ मोठ्या महानगरपालिका आहे. मुंबई आणि परिसरामध्ये नागरीकरण मोठ्या प्रमाणात होण्याचे कारण म्हणजे, महाराष्ट्राच्याच नव्हे तर संपूर्ण देशाच्या वेगवेगळ्या भागातून मुंबई परिसरामध्ये लोक मोठ्या प्रमाणात स्थलांतर करतात. मुंबई आणि परिसरामध्ये वाढलेले नागरीकरण, औद्योगीकरण यामुळे अनेक लोकांना रोजगाराच्या संधी प्राप्त होतात त्यामुळे मुंबई आणि नजीकच्या परिसरांमध्ये लोकसंख्या अतिशय जलद गतीने वाढत आहे. मुंबईला लागून असलेले पालघर आणि रायगड या जिल्ह्यांमध्ये देखील नागरीकरणामध्ये झालेली वाढ अचंबित करणारी आहे. मुंबई आणि परिसरामधील लोकसंख्येची घनता देखील जास्त आहे. यामुळे नागरीकरणाच्या विविध समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्यामध्ये वाहतूक, पाणी, विद्युत पुरवठा, कचऱ्याचा प्रश्न, सांडपाण्याचा प्रश्न, सार्वजनिक स्वच्छता, आरोग्याचा प्रश्न, गुन्हेगारी, हवा प्रदूषण, ध्वनि प्रदूषण आणि गर्दी यासारख्या समस्यांना मुंबई शहराला सामोरे जावे लागते. मुंबई आणि लगतच्या परिसरामध्ये गलिच्छ वस्त्यांची संख्यादेखील झपाट्याने वाढलेली आहे. मुंबईमधील धारावी ही आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी आहे.

**२) जास्त नागरीकरण (५० ते ७५ टक्के)**

साधारण ७५ टक्क्याहून कमी आणि ५० टक्क्याहून जास्त नागरीकरण झालेला प्रदेश हा जास्त नागरीकरणाचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्रामध्ये नागपूर आणि पुणे या दोन जिल्ह्यांमध्ये पन्नास टक्क्यांहून अधिक नागरीकरण झालेले आहे. त्यामध्ये नागपूर जिल्ह्यामध्ये ६८.३ टक्के तर पुणे जिल्ह्यामध्ये ६०. ८९ टक्के नागरीकरण झालेले आहे. यापैकी नागपूर हे शहर महाराष्ट्राची उपराजधानी असून विदर्भामधील एक

महत्त्वाचे नागरी संकुल आहे. नागपूर जिल्ह्यामध्ये विदर्भाच्या इतर जिल्ह्यांच्या तुलनेत रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध असल्याने विदर्भातील इतर जिल्ह्यांमधून नागपूर शहराकडे स्थलांतराचा ओघ अधिक आहे. पुणे जिल्हा ही महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखले जाते. पुणे जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण झालेले आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड या शहरांबरोबर चाकण, तळेगाव, रांजणगाव, सणसवाडी, जेजुरी, बारामती या भागातील औद्योगिक क्षेत्रामुळे तसेच बांधकाम क्षेत्रात निर्माण झालेल्या विविध संधी, यामुळे जिल्ह्यात रोजगाराच्या वेगळ्या क्षेत्रात संधी निर्माण झालेल्या आहेत याचा परिणाम म्हणजे पुणे जिल्ह्यामध्ये नागरीकरणाची पातळी ६० टक्क्यांहून अधिक झालेले आहे.

**३) मध्यम नगारीकरण (२५ ते ५० टक्के)**

२०११ च्या जनगणने अहवालानुसार औरंगाबाद ४३.७४, नाशिक ४२.५३, अकोला ३६.६९, रायगड ३६.९१, अमरावती ३५.९, चंद्रपूर ३५.८, वर्धा ३२.४७, सोलापूर ३२.४, जळगाव ३१.८, कोल्हापूर ३१.७५, परभणी ३१.०४, धुळे २७.९१, नांदेड २७.२३, सांगली२५.५१ आणि लातूर २५.४७ या **पंधरा** जिल्ह्यांमध्ये २५ टक्क्याहून अधिक आणि ५० टक्क्याहून कमी म्हणजेच मध्यम नागरीकरण झालेले आहे. वास्तविक औरंगाबाद आणि नाशिक या जिल्ह्यांमध्ये ४०टक्क्यापेक्षा जास्त नागरीकरण झालेले आहे. नाशिक हे पश्चिम महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे सांस्कृतिक केंद्र आहे त्यामुळे नाशिक जिल्ह्याची लोकसंख्या जलद गतीने वाढत आहे. तसेच मराठवाड्यातील औरंगाबाद हे एक प्रमुख औद्योगिक शहर आहे. मराठवाड्यातील इतर भागातून औरंगाबाद शहराकडे होणाऱ्या स्थलांतरामुळे औरंगाबाद जिल्ह्याची लोकसंख्या व नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. उर्वरित जिल्ह्यांमधील सोलापूर, कोल्हापूर, सांगली हे पश्चिम महाराष्ट्रातील शेती आणि उद्योगप्रधान जिल्हे आहेत, त्यामुळे त्यांची लोकसंख्या वाढत आहे. तसेच रायगड जिल्ह्याचे स्थान मुंबईच्या नजीक असल्यामुळे रायगड जिल्ह्यातही नागरी लोकसंख्येमध्ये वाढ होत आहे. साधारण जिल्हयाच्या ग्रामीण भागातून शहरी भागाकडे शिक्षित समाजाचा असलेला कल यामुळे या जिल्ह्यांच्या ठिकाणांना वरील नागरी लोकसंख्येमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे या जिल्हयामधील एकंदरीतच शहरी लोकसंख्येत वाढ हळूहळू वाढ होत आहे.

**४) कमी नगारीकरण (० ते २५ टक्के)**

साधारण २५ टक्क्याहून कमी नागरीकरण झालेल्या जिल्ह्यांमध्ये नागरीकरणाची पातळी कमी आहे असे म्हणावे लागेल. २५ टक्क्याहून कमी नागरीकरण झालेले महाराष्ट्र मध्ये एकूण १५ जिल्हे आहेत. यामध्ये

यवतमाळ २१.५९, बुलढाणा २१.२३, अहमदनगर २०.१, बीड १९.९, भंडारा १९.५, जालना १९.२६, सातारा १८.९८, वाशिम १७.६९, गोंदिया १७.०७, उस्मानाबाद १६.९६, नंदुरबार १६.७२, रत्नागिरी १६.३५, हिंगोली १५.१७, सिंधुदुर्ग १२.६, आणि गडचिरोली ११ टक्के हे **१५ जिल्हे** आहेत. साधारणत: प्रतिकूल भौगोलिक परिस्थिती आणि रोजगारांच्या संधीची कमी उपलब्धता तसेच प्राथमिक व्यवसायावर आधारित अर्थव्यवस्था यामुळे या जिल्ह्यांमधील नागरीकरणाची पातळी कमी आहे. त्यापैकी गडचिरोली, हिंगोली, नंदुरबार, गोंदिया, आणि वाशिम हे जिल्हे आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण जास्त असलेले जिल्हे आहेत. या जिल्ह्यांमधून इतर जिल्ह्यांमध्ये होणाऱ्या स्थलांतरामुळे एकंदरीत लोकसंख्येचे प्रमाण कमी दिसते शिवाय या जिल्हयामध्ये नागरीकरणाचे प्रमाणही कमी मी दिसते. कोकणातील सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या जिल्ह्यांमधील नागरीकरणाची पातळी ही कमी आहे. कोकणामधील औद्योगीकरण आणि रोजगारांच्या संधीच्या अभावामुळे बहुतांशी लोक मुंबई आणि परिसरामध्ये स्थलांतरित होतात. याचा परिणाम या जिल्ह्यातील एकंदरीत लोकसंख्या आणि नागरी लोकसंख्येवर झाल्याचा दिसतो. सर्वसाधारणपणे ज्या जिल्ह्यांमधील नागरीकरणाची पातळी कमी आहे, त्या जिल्ह्यांमधील सुशिक्षित समाज हा उत्तम प्रकारचे जीवन उपभोगण्यासाठी मोठ्या शहराकडे स्थलांतर करतो. या सर्व जिल्ह्यांमधील सुशिक्षित समाज पुणे, मुंबई, नाशिक, नागपूर आणि औरंगाबाद या मोठ्या शहराकडे आकर्षिला जातो त्यामुळे या जिल्ह्यांमधील नागरी संकुलांचा पाहिजे तेवढा विकास झालेला नाही.

महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक नागरीकरण झालेले ३, जास्त नागरीकरण झालेले २, मध्यम नागरीकरण झालेले १५ आणि कमी नागरीकरण झालेले १५ जिल्हे आहेत.

**महाराष्ट्रातील जिल्हयामधील मागील दशकातील शेकडा वाढ**

अ) सर्वाधिक वाढ

२००१ ते २०११ या दशकाच्या दरम्यान नागरी लोकसंख्येमध्ये शेकडा सर्वाधिक वाढ पुढील जिल्ह्यांमध्ये झाल्याचे दिसते. रायगड ८१.८९, गडचिरोली ७५.३४, आणि गोंदिया ५७.३६, रायगड, गडचिरोली, आणि गोंदिया या जिल्ह्यांमध्ये नागरे लोकसंख्येमध्ये शेकडा वाढ जरी अधिकार असली, तरी एकंदरीत नागरी लोकसंख्येचे प्रमाण अल्प असल्याचे दिसते. परंतु ठाणे ४४.०६, पुणे ३६.६३ आणि नाशिक ३४.१ या जिल्ह्यांमध्ये नागरी लोकसंख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसते.

**तक्ता – महाराष्ट्र लोकसंख्येचे जिल्हानिहाय वितरण (नागरी, ग्रामीण आणि एकूण) २०११**


| अ. नं. | जिल्हा | एकूण | ग्रामीण | नागरी | शहरी लोकसंख्येचे शेकडा प्रमाण | शहरी लोकसंख्येतील दशवार्षिक वाढ २००१–२०११ |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 8 |
| **0** | **महाराष्ट्र** | **112,372,972** | **61,545,441** | **50,827,531** | **45.23** | **23.67** |
| 1 | नंदुरबार | 1,646,177 | 1,370,995 | 275,182 | 16.72 | 35.78 |
| 2 | धुळे | 2,048,781 | 1,477,034 | 571,747 | 27.91 | 28.23 |
| 3 | जळगाव | 4,224,442 | 2,880,984 | 1,343,458 | 31.80 | 27.61 |
| 4 | बुलढाणा | 2,588,039 | 2,038,650 | 549,389 | 21.23 | 16.06 |
| 5 | अकोला | 1,818,617 | 1,096,768 | 721,849 | 39.69 | 15.04 |
| 6 | वाशिम | 1,196,714 | 985,058 | 211,656 | 17.69 | 18.61 |
| 7 | अमरावती | 2,887,826 | 1,851,134 | 1,036,692 | 35.90 | 15.24 |
| 8 | वर्धा | 1,296,157 | 875,284 | 420,873 | 32.47 | 29.48 |
| 9 | नागपुर | 4,653,171 | 1,474,977 | 3,178,194 | 68.30 | 21.6 |
| 10 | भंडारा | 1,198,810 | 965,053 | 233,757 | 19.50 | 33.02 |
| 11 | गोंदिया | 1,322,331 | 1,096,631 | 225,700 | 17.07 | 57.36 |
| 12 | गडचिरोली | 1,071,795 | 953,858 | 117,937 | 11.00 | 75.34 |
| 13 | चंद्रपुर | 2,194,262 | 1,424,424 | 769,838 | 35.08 | 15.75 |
| 14 | यवतमाळ | 2,775,457 | 2,176,252 | 599,205 | 21.59 | 31.06 |
| 15 | नांदेड़ | 3,356,566 | 2,442,734 | 913,832 | 27.23 | 32.62 |
| 16 | हिंगोली | 1,178,973 | 1,000,102 | 178,871 | 15.17 | 16.13 |
| 17 | परभणी | 1,835,982 | 1,266,112 | 569,870 | 31.04 | 17.45 |
| 18 | जलना | 1,958,483 | 1,581,251 | 377,232 | 19.26 | 22.53 |
| 19 | औरंगाबाद | 3,695,928 | 2,079,327 | 1,616,601 | 43.74 | 48.7 |
| 20 | नाशिक | 6,109,052 | 3,510,885 | 2,598,167 | 42.53 | 34.1 |
| 21 | ठाणे | 11,054,131 | 2,551,037 | 8,503,094 | 76.92 | 44.06 |
| 22 | मुंबई उपनगर | 9,332,481 | -- | 9,332,481 | 100.00 | 8.01 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 23 | मुंबई | 3,145,966 | -- | 3,145,966 | 100.00 | 5.75 |
| 24 | रायगड | 2,635,394 | 1,662,585 | 972,809 | 36.91 | 81.89 |
| 25 | पुणे | 9,426,959 | 3,687,243 | 5,739,716 | 60.89 | 36.63 |
| 26 | अहमदनगर | 4,543,083 | 3,630,012 | 913,071 | 20.10 | 13.61 |
| 27 | बीड | 2,585,962 | 2,071,277 | 514,685 | 19.90 | 32.97 |
| 28 | लातूर | 2,455,543 | 1,830,085 | 625,458 | 25.47 | 27.58 |
| 29 | उस्मानाबाद | 1,660,311 | 1,378,713 | 281,598 | 16.96 | 20.72 |
| 30 | सोलापुर | 4,315,527 | 2,917,088 | 1,398,439 | 32.40 | 14.13 |
| 31 | सतारा | 3,003,922 | 2,433,694 | 570,228 | 18.98 | 43.23 |
| 32 | रत्नागिरी | 1,612,672 | 1,349,062 | 263,610 | 16.35 | 37.15 |
| 33 | सिंधुदुर्ग | 848,868 | 741,870 | 106,998 | 12.60 | 29.98 |
| 34 | कोल्हापुर | 3,874,015 | 2,644,119 | 1,229,896 | 31.75 | 17.09 |
| 35 | सांगली | 2,820,575 | 2,101,143 | 719,432 | 25.51 | 13.62 |


**स्त्रोत – जनगणना अहवाल महाराष्ट्र निष्कर्ष २०११**

नागरी लोकसंख्येमध्ये जिल्हा नुसार शेकडा वाढ पाहिल्यास असे दिसून येते की पन्नास टक्क्यांहून अधिक वाढ रायगड, गडचिरोली आणि गोंदिया या तीन जिल्हयामध्ये झालेली आहे. त्यापैकी गडचिरोली आणि गोंदिया या या जिल्हयामध्ये शेकडा लोकसख्यां वाढीचे प्रमाण जरी अधिक असले तरी एकूण लोकसंख्येत झालेली वाढ मात्र कमी आहे. परंतू रायगड जिल्हयामध्ये सर्वाधिक नागरी लोकसंख्येत वाढ नोंदविलेली असून ही वाढ जवळजवळ ८१.८९ टक्के आहे आणि एकूण लोकसंख्येचे प्रमाण ९,७२,८०९ इतके आहे. २५ ते ५० टक्केच्या दरम्यान शेकडा वाढ झालेल्या जिल्ह्यांमध्ये औरंगाबाद, ठाणे, सातारा, रत्नागिरी, पुणे, नंदुरबार, नाशिक, भंडारा, बीड, नांदेड, यवतमाळ, सिंधुदुर्ग, वर्धा, धुळे, जळगाव आणि लातूर हे १५ जिल्हे आहेत. उर्वरित १६ जिल्ह्यांमध्ये नागरी लोकसंख्येत झालेली वाढ ही पंचवीस टक्क्यापर्यंत दिसते. महाराष्ट्र राज्यामध्ये मागील दशकांमध्ये २३.६७ टक्के एवढी नागरी लोकसंख्येत शेकडा वाढ झालेली आहे. महाराष्ट्राच्या नागरी लोकसंख्येपेक्षा सरासरी शेकडा वाढ झालेले १९ जिल्हे आहेत.


आलेख – महाराष्ट्रातील जिल्हानिहाय नागरी लोकसंख्येचे वितरण २०११



आलेख – महाराष्ट्रातील जिल्हानिहाय नागरी लोकसंख्येत दशवार्षिक शेकडा वाढ २००१–२०११




नकाशा – महाराष्ट्रातील नागरी आणि ग्रामिण लोकसंख्येचे प्रमाण २०११




स्त्रोत – जनगणना अहवाल २०११

नकाशा – नागरी लोकसंख्येमध्ये २००१ ते २०११ या दरम्यान झालेला बदल दर्शक नकाशा




स्त्रोत – जनगणना अहवाल २०११

## महाराष्ट्रातील दशलक्षी शहरे

२०११ च्या जनगणना अहवालानुसार महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण १० दशलक्षी शहरे आहेत. दशलक्षी शहरे म्हणजे ज्या शहरांची नागरी लोकसंख्या दहा लाखाहून अधिक आहे अशी शहरे. या शहरांमध्ये बृहन्मुंबई शहरामध्ये ठाणे, कल्याण डोंबिवली आणि नवी मुबई या शहरांचा समावेश केला जातो. तर पुणे शहरामध्ये पुणे आणि पिंपरी चिंचवड या शहरांचा समावेश होतो. अशी भारतामध्ये बृहन्मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, वसई विरार आणि औरंगाबाद अशी सहा शहरे दशलक्षी शहरे म्हणून ओळखली जातात.

### तक्ता – महाराष्ट्रातील दशलक्षी शहरे

| अ.नं. | दशलक्षी शहराचे नाव | लोकसंख्या | शहर/उपनगर लोकसंख्या | लिंग गुणोत्तर | साक्षरता |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मुंबई | 12,442,373 | 18,414,288 | 853 | 89.73 |
| 2 | पुणे | 3,124,458 | 5,049,968 | 948 | 89.56 |
| 3 | नागपूर | 2,405,665 | 2,497,777 | 963 | 91.92 |
| 4 | ठाणे | 1,841,488 | 1,841,488 | 888 | 89.41 |
| 5 | पिंपरी आणि चिंचवड | 1,727,692 | 1,727,692 | 833 | 89.22 |
| 6 | नाशिक | 1,486,053 | 1,562,769 | 899 | 89.85 |
| 7 | कल्याण आणि डोंबिवली | 1,247,327 | 1,247,327 | 920 | 91.37 |
| 8 | वसई विरार | 1,222,390 | 1,222,390 | 886 | 88.57 |
| 9 | औरंगाबाद | 1,175,116 | 1,189,376 | 929 | 87.49 |
| 10 | नवी मुंबई | 1,120,547 | 1,120,547 | 837 | 89.62 |

**स्त्रोत – जनगणना अहवाल २०११**

मुंबई या शहराचे नागरी लोकसंख्येचे प्रमाण सर्वाधिक (१८४१४२८८) असून त्या खालोखाल पुणे (५०४९९६८), आणि नागपूर २४९७७७ शहरे आहेत. महाराष्ट्रातील दशलक्षी शहरांमध्ये लिंगगुणोत्तर कमी आहे. त्यापैकी पिंपरीचिंचवड आणि मुंबई या शहरामधील लिंगगुणोत्तर कमी आहे. तर नागपूर आणि पुणे या शहरामधील लिंगगुणोत्तर अनुक्रमे ९६३ आणि ९४८ आहे. महाराष्ट्रातील शहरी भागातील साक्षरतेची पातळी ९० टक्क्याच्या दरम्यान आहे.नागरी भागापैकी कल्याण डोंबिवली शहराची साक्षरतेची पातळी ९१.३७ टक्के आहे. तर औरंगाबाद शहराची साक्षरतेची पातळी नागरी भागापैकी सर्वात कमी म्हणजे ८७.४९ टक्के आहे.

## महाराष्ट्रातील महानगरपालिका क्षेत्रे

तक्ता – महाराष्ट्रातील महानगरपालिका (स्थापना वर्ष आणि लोकसंख्या)

| अ. नं. | महानगरपालिका | जिल्हा | स्थापना वर्ष | लोकसंख्या २०११ लाख |
|---|---|---|---|---|
| 1 | मुंबई | मुंबई उपनगर जिल्हा | 1888 | 119.1 |
| 2 | पुणे | पुणे | 1950 | 31.2 |
| 3 | नागपूर | नागपूर | 1951 | 24.1 |
| 4 | ठाणे | ठाणे | 1982 | 18.2 |
| 5 | पिंपरी–चिंचवड | पुणे | 1982 | 17.3 |
| 6 | नाशिक | नाशिक | 1982 | 14.9 |
| 7 | कल्याण–डोंबिवली | ठाणे | 1982 | 12.5 |
| 8 | वसई–विरार | पालघर | 2009 | 12.2 |
| 9 | औरंगाबाद | औरंगाबाद | 1982 | 11.7 |
| 10 | नवी मुंबई | ठाणे | 1992 | 11.2 |
| 11 | सोलापूर | सोलापूर | 1964 | 9.5 |
| 12 | मीरा–भाईंदर | ठाणे | 2002 | 8.1 |
| 13 | भिवंडी–निजामपूर | ठाणे | 2002 | 7.1 |
| 14 | अमरावती | अमरावती | 1983 | 6.5 |
| 15 | नांदेड–वाघाळा | नांदेड | 1997 | 5.5 |
| 16 | कोल्हापूर | कोल्हापूर | 1972 | 5.5 |
| 17 | अकोला | अकोला | 2001 | 5.4 |
| 18 | पनवेल | रायगड | 2016 | 5.1 |
| 19 | उल्हासनगर | ठाणे | 1998 | 5.1 |
| 20 | सांगली–मिरज आणि कुपवाड | सांगली | 1998 | 5 |
| 21 | मालेगाव | नाशिक | 2003 | 4.7 |
| 22 | जळगाव | जळगाव | 2003 | 4.6 |
| 23 | लातूर | लातूर | 2011 | 3.8 |
| 24 | धुळे | धुळे | 2003 | 3.8 |
| 25 | अहमदनगर | अहमदनगर | 2003 | 3.5 |
| 26 | चंद्रपूर | चंद्रपूर | 2011 | 3.2 |
| 27 | परभणी | परभणी | 2011 | 3.1 |

महाराष्ट्रामध्ये सद्य स्थितीत २७ महानगर पालिका आहेत. लोकसंख्या आणि इतर नागरी निकषांच्या अधारे त्या महानगरपालिकांची स्थापना करण्यात आलेली आहे. मुंबई महानगरपालिकचे स्थापना स्वांतत्र्यपूर्व काळात १८८८ साली झालेली असून मुंबई महानगरपालिकेची लोकसंख्या ११९.१ लाख इतकी आहे. सर्वात अलीकडील काळात महानगरपालिकेचा दर्जा मिळालेले रायगड जिल्हयातील पनवेल हे शहर असून त्र्याची लोकसंख्या ५.१ कोटी आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने चंद्रपूर महानगरपालिका (३.२ लाख)सर्वात कमी लोकसंख्या असलेली आहे. पालघर जिल्हयातील वसई विरार या महानगर पालिकेची स्थापना २००९ झालेली असून १२.२ लाख लोकसंख्या आहे. तुलनेने १९७२ मध्ये कोल्हापूर महानगरपालिकेची स्थापना होऊन लोकसंख्या २०११ च्या जनगणना अहवालानुसार ५.५ लाख इतकी आहे.

## महाराष्ट्रातील नागरीकरणाची वैशिष्टये

१. महाराष्ट्र मध्ये सर्वात जास्त दशलक्षी शहरे आहेत. असून नागरी लोकसंख्येचे प्रमाण महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक आहे.

२. भारतातील एकूण नागरी लोकसंख्येपैकी १३.१५ टक्के नागरी लोकसंख्या फक्त महाराष्ट्र या राज्यामध्ये आढळून येते. एकूण नागरी लोकसंख्येच्या संदर्भात भारतामध्ये महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आहे.

३. उत्तर प्रदेशाच्या लोकसंख्येनंतर महाराष्ट्राचा लोकसंख्येच्या संदर्भात दुसरा क्रमांक लागतो.

४. मागील दशकांमध्ये महाराष्ट्राच्या लोकसंख्येमध्ये १७.८ दशलक्ष लोकसंख्येचे भर पडली आहे.

५. १९९१ ते २०११ या कालावधीत महाराष्ट्राची नागरी लोकसंख्या ३०.५४ दशलक्षाहून ५०.८३ दशलक्ष पर्यंत पोहोचलेली आहे.

६. संपूर्ण देशाच्या तसेच महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून शहरी भागाकडे झालेल्या स्थलांतरामुळे महाराष्ट्राच्या नागरी लोकसंख्येमध्ये कमालीची वाढ झालेली आहे.

७. महाराष्ट्राच्या नागरीकरणाच्या संदर्भात झालेली वाढ ही अतिशय विषम स्वरूपाची आहे महाराष्ट्राच्या पूर्व भागाच्या तुलनेत पश्चिम भागामध्ये नागरी लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे.

८. महाराष्ट्रातील मराठवाडा आणि विदर्भामध्ये नागरीकरणाची पातळी सर्वात कमी आहे.

९. महाराष्ट्रातील मुंबई आणि मुंबईच्या उपनगरांमध्ये १०० टक्के शहरीकरण झालेले आहे.

१०.सिंधुदुर्ग, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये नागरीकरणाची पातळी सर्वात कमी आहे. (१५ टक्क्याहून कमी

११.महाराष्ट्रामध्ये एकूण सहा नागरीकरण झालेले विभाग आहे त्यामध्ये मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, वसई विरार, आणि औरंगाबाद या सर्व विभागांची लोकसंख्या दहा लक्षा हून अधिक आहे.

१२.महाराष्ट्रातील शहरांमध्ये लोकसंख्या वाढीचे प्रमुख कारण म्हणजे रोजगाराची हमी, शिक्षण आणि उच्च दर्जाचे राहणीमान या घटकांमुळे देशाच्या विविध भागातून आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लोक शहरांकडे आकर्षिले जातात.

१३.नागरीकरणाच्या बाबत शेकडेवारीत महाराष्ट्राचा भारतात पाचवा क्रमांक लागतो. परंतू एकूण लोकसंख्येची तुलना केली असतात महाराष्ट्रामध्ये असणारील ५०.८३ दशलक्ष लोकसंख्या ही भारतातील कोणत्याही राज्यातील नागरी लोकसंख्येच्या तुलनेत सर्वाधिक आहे.

१४.एकूण लोकसंख्येच्या प्रमाणाचा विचार केला असतात भारतात महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आहे. भारतातील एकूण शहरी लोकसंख्येपैकी १३.५ टक्के लोकसंख्या महाराष्ट्रात राहते. महाराष्ट्राखालोखाल उत्तरप्रदेशात ११.८ टक्के नागरी लोकसंख्या आहे. उर्वरित कोणत्याही राज्यामध्ये हे प्रमाण १० टक्क्याहून अधिक नाही.

१५.महाराष्ट्रातील शहरी लोकसंख्येमध्ये १९०१ पासून १९०१ आणि १९६१ हे दोन अपवाद वगळता सातत्याने वाढ होत गेली आहे.

१६.१९५१ मध्ये झालेल्या जनगणना अहवालानुसार महाराष्ट्राच्या नागरी लोकसंख्येमध्ये दशवार्षिक ७.६४ टक्के इतकी सर्वात जास्त शेकडा वाढ होऊन नागरी लोकसंख्येचे शेकडा प्रमाण २८.७५ एवढे झाले होते.

१७.२०११ सालामध्ये महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्येचे शेकडा प्रमाण ४५.२२ इतके होते, हे प्रमाण भारताच्या नागरी लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा अधिक असल्याचे दिसते.

१८.२०११च्या जनगणना अहवालानुसार महाराष्ट्रामध्ये जिल्हानिहाय नागरीकरणाचा कल पाहिला असता असे दिसून येते की, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, नागपूर, मुंबई, नाशिक या जिल्ह्यांची नागरी लोकसंख्या पंचवीस लाखाहून अधिक आहे.

१९.बृहन्मुंबई आणि मुंबई हे दोन जिल्हे १०० टक्के नागरीकरण झालेले जिल्हे आहेत.

२०.महाराष्ट्रामध्ये सर्वात कमी नागरी लोकसंख्येचे प्रमाण सिंधुदुर्ग (१०६९९८) जिल्ह्यामध्ये आहे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नागरी लोकसंख्येचे शेकडा प्रमाण फक्त १२.६० टक्के इतके आहे. व सर्वात कमी शेकडा प्रमाण गडचिरोली जिल्ह्यामध्ये ११ टक्के इतके आहे.

२१.पूर्व महाराष्ट्रातील जिल्हयामध्ये नागरी लोकसंख्येत झालेली शेकडा वाढ जरी अधिक असली तरी एकंदरीत लोकसंख्येचे प्रमाण कमी आहे.

२२.२००१ ते २०११ या दशकाच्या दरम्यान नागरी लोकसंख्येमध्ये शेकडा ७५ टक्क्याहून अधि वाढ रायगड आणि गडचिरोली या जिल्हयामध्ये झालेली आहे.

२३.एकूण नागरी लोकसंख्येत सर्वाधिक वाढ ठाणे आणि पुणे जिल्हयामध्ये झालेली आहे.

२४.महाराष्ट्र राज्यामध्ये मागील दशकांमध्ये २३.६७ टक्के एवढी नागरी लोकसंख्येत शेकडा वाढ झालेली आहे. महाराष्ट्राच्या नागरी लोकसंख्येपेक्षा सरासरी शेकडा वाढ झालेले १९ जिल्हे आहेत.

२५.२०११ च्या जनगणना अहवालानुसार महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण १० दशलक्षी शहरे आहेत.

२६.महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक नागरीकरण झालेले ३, जास्त नागरीकरण झालेले २, मध्यम नागरीकरण झालेले १५ आणि कमी नागरीकरण झालेले १५ जिल्हे आहेत.

२७.महाराष्ट्रामध्ये सद्य स्थितीत २७ महानगरपालिका आहेत. मुंबई महानगरपालिकेची सर्वात जुनी महानगरपालिका आहे.

२८.२०२१ च्या जनगणना अहवालामध्ये महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्येचे प्रमाण ६० टक्क्याहून अधिक होऊ शकते.

**संदर्भ**

१. मानवी भूगोल (२०१९) – डॉ. ज्योतीराम मोरे, डॉ. संजय पगार, डॉ. अशोक थोरात – निराली प्रकाशन.

२. मानवी भूगोल (२०००) – डॉ. विठ्ठल घारपुरे – पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर

३. मानवी भूगोल (२०१५) – प्रा. सवदी, प्रा. कोळेकर – निराली प्रकाशन.

४. कृषी भूगोल (२०१५) – डॉ. संजय पगार, डॉ. ज्योतीराम मोरे, प्रा. अशोक थोरात – अथर्व प्रकाशन

५. कृषी भूगोल (२००९) – शिवाजी विद्यापीठ दूर शिक्षण केंद्र संपादक – डॉ. पी. व्ही. पाटील, श्री. एच. पी. पाटील, श्री. ए. बी. पाटील

६. मराठी विश्वकोष – https://vishwakosh.marathi.gov.in/

https://www.wikipedia.org/